भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA 2024 प्रतिज्ञापत्रा व्यतिरिक्त 12AB 819360

| | | | |
|---|---|---|---|
| दस्ताचा प्रकार | : | अनुच्छेद क्रमांक | |
| दस्त नोंदणी करणार आहात का? | : | दु.नि.कार्यालयाचे नांव : | |
| मिळकतीचे वर्णन | : | | |
| मोबदला रक्कम | : | | |
| मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता | : | दत्ताजीराव कदम आर्टस,सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी प्राचार्य डॉ. एस.एम. मणेर | |
| हस्ते असल्यास त्याचे नांव व पत्ता | : | रोहित प्रकाश शिंगे रा. इचलकरंजी | |
| दुसऱ्या पक्षकाराचे नांव व पत्ता | : | द.म.सा. सभा कोल्हापूर | |
| मुद्रांक शुल्क एकूण रूपये | : | 100 पैकी रू. | |
| मुदांक विक्री नोंद वही अनुक्रमांक | : | 4058 दिनांक : 23/07/2024 | |
| मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही | | मुद्रांक विक्रेत्याची सही | |

मुद्रांक विक्रेत्याचे नांव : श्री श्रीकांत तुकाराम सातपुते, पत्ता - अग्नीशमनदल (फायर ब्रिगेड) रोड, लगारे बिल्डींग, इचलकरंजी
मुद्रांक विक्री परवाना क्रमांक : ८/९३ लायसन्स कोड नं. २६०७००९

Sub Treasury Office Ichalkaranji
16 JUL 2024
Sub Treasury Officer Ichalkaranji

ज्या कारणासाठी ज्यांन मुदांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

## दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

तालुका हातकणंगले , जिल्हा कोल्हापूर ४१६११५

## मराठी विभाग

आणि

## दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर. या संस्थातील

# सामंजस्य करार
# MEMORANDUM OF UNERSTANDING BETWEEN

## दिनांक २४ जुलै २०२४

### ❖ समन्वय आणि अंमलबजावणी

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वयक आणि अंमलबजावणीसाठी दक्षिण महाराष्ट्र मराठी साहित्य सभेचे अध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, मराठी विभाग प्रमुख आणि समन्वयक काम करतील.

२. सदर सामंजस्य करार महाविद्यालयाच्या लेटर हेडवर, कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधिन राहून तीन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.

३. सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयक अधिका-यांत होत आहे. तसेच वर नमूद केलेल्या दिनांकापासून अंमलात येत आहे.

**प्रस्तावना**

मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञानप्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयावर राष्ट्रीय चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधांना पारितोषिक, ललित, ललितेतर, संपादित ग्रंथांना पारितोषिक दिले जाते. महाविद्यालयाच्या मराठी विभागामार्फत विविध उपक्रम आयोजित केले जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्याचे काम केले जाते. या सामंजस्य करारातून दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन करता येईल. विद्यार्थी केंद्रित उपक्रमासाठी महाविद्यालयाचा मराठी विभाग व दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा यांच्यात हा सामंजस्य करार करण्यात येत आहे.

वरील नमूद केलेल्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर आणि मराठी विभाग दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी या संस्था दिनांक २४ जुलै, २०२४ रोजी एकमेकांबरोबर सामंजस्य करार करत आहेत. सदर कराराची अंमलबजावणी पुढील पाच वर्षासाठी करण्यात येईल. या कराराची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

Scanned with OKEN Scanner

**उद्दिष्टये :**

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.
२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.
३. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थी केंद्रित विविध उपक्रमांसाठी सहयोग व सहकार्य करणे.
४. निबंध, वक्तृत्व, वाद-विवाद प्रश्नमंजूषा कथालेखन काव्यलेखन, काव्यवाचन, कथा-कथन इ. स्पर्धांचे आयोजन करणे.
५. व्यक्तिमत्व विकास व कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.
६. सर्जनशील लेखन व उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.
७. विद्यार्थ्यांचा भाषिक विकास करण्यासाठी सहकार्य करणे.
८. मराठी भाषेतील दर्जेदार साहित्यकृती विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देणे.
९. विद्यार्थ्यांना साहित्य निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे. त्यासाठी कार्यशाळांचे आयोजन करणे.
१०. मराठी भाषा संवर्धनासाठी व भाषा विकासासाठी प्रयत्न करणे.

**अटी आणि शर्थी**

१. महाविद्यालयातील मराठी विभागाच्या विविध उपक्रमामध्ये दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, ही संस्था सक्रिय सहभाग घेईल. तसेच दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या विविध उपक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक सहभागी होतील.
२. दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या संस्थेचा एखादा उपक्रम महाविद्यालयाच्या मराठी विभागाने राबवायचा असल्यास संकल्पित आर्थिक तरतूद संस्था करेल. अन्यथा आपापल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे अपेक्षित आहे.
३. उपरोक्त नमूद दोन्ही संस्थां परस्पर सहमतीच्या उपक्रमाखेरीज संस्थांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी आवश्यक उपक्रम आपल्या सोयीनुसार घेण्यास स्वतंत्र असतील. त्यासाठी परस्परांच्या संमतीची आवश्यकता असणार नाही.
४. परस्पर सामंजस्य करारातील, उदाहरणातील नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती होऊ जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्ही पैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.
५. कोणत्याही प्रकारचा भत्ता एकमेकांना देणे बंधनकारक नाही.
६. सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.
७. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

Scanned with OKEN Scanner

**एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे**

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये सहकार्य करणे.
२. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.
३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.
४. मराठी भाषा संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविणे.
५. विद्यार्थी केंद्रित उपक्रम आयोजित करणे. त्यासाठी एकमेकांना सहकार्य करणे.
६. शैक्षणिक व मराठी भाषा संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविणे व त्यासाठी एकमेकांना सहकार्य करणे.

**समारोप**

प्रस्तुत करार हा केवळ शैक्षणिक मराठी भाषा संवर्धनासाठी विविध उपक्रम घेण्यासाठी करण्यात आलेला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध उपक्रमामध्ये सहभागी करून घेता येईल. तसेच दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर आणि मराठी विभाग, दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी या संस्थांच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये विविध उपक्रम घेता येतील. विद्यार्थ्यांना मराठी विषयाची विविध माहिती करून देणे, त्यांना साहित्याची आवड होईल या दृष्टीने प्रयत्न करणे. यासाठी एकमेकांना आवश्यक ते सहकार्य करणे हा या कराराचा मुख्य हेतू आहे.

याप्रमाणे आम्ही खालीलप्रमाणे सामंजस्य करारासाठी सह्या करीत आहोत.

प्रा. (डॉ.)सुभाष जाधव
(प्रमुख, मराठी विभाग)
प्रमुख
मराठी विभाग
डी.के.ए.एस.सी.कॉलेज
इचलकरंजी

डॉ. एम. एम. मणेर
प्राचार्य,
डी.के.ए.एस.सी. कॉलेज,
इचलकरंजी.

डॉ. विनोद कांबळे
(कार्यवाह)
दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा,
कोल्हापूर

श्री.भीमराव धुळुबुळू
(अध्यक्ष)
दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा,
कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner